MHSO120006332025

दाखल तारीख :– ०९.०९.२०२५
नोंदणी तारीख :– ०९.०९.२०२५
निकाल तारीख :– १३.०३.२०२६
कालावधी :– व. म. दि.
०० ०६ ०४

**बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी : प्र. भ. लोखंडे )**

**न्यायचौकशी विरहीत किरकोळ अर्ज क्रमांक ३/२०२५**

**(निशाणी क्र.२४)**

**श्री. युनूस नूरमहंमद शेख,** }
वय– ५६ वर्षे, धंदा – शेती/व्यापार, }
रा. द्वारका प्लॅटीनिअम A–१ सेक्टर नं.७, }
प्लॉट नं.८५, बँक ऑफ महाराष्ट्राजवळ, इंद्रायणीनगर, }
भोसरी, ता. हवेली, जि. पुणे. }...... **अर्जदार.**

**– विरूद्ध –**

**श्री. धनंजय पोपट लोमटे,** }
वय– ५२ वर्षे, धंदा – शेती/व्यापार, }
रा. सेक्टर नं.९ प्रगती एम्पाअर, A–४०४, }
मोशी प्राधिरण मोशी, ता. हवेली, जि. पुणे. }...... **सामनेवाला.**

**अर्ज :– दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व १५२ अन्वये.**

अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. मुजावर,
सामनेवाला तर्फे एकतर्फा आदेश.

## न्यायनिर्णय
**( आज दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी घोषीत केला )**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व १५२ अन्वये दाखल केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदाराने सामनेवालाविरुद्ध विशेष मुकदमा नं.४९/२०२० दाखल केला. सदर दाव्याचा निकाल दिनांक २३.०७.२०२४ रोजी पारीत झाला. दाव्यात दावा मिळकतीचे वर्णन करताना

मौजे रस्तापूर असे नमूद केले होते. न्यायनिर्णयमध्ये देखील रस्तापूर ऐवजी चुकून राळेरास असे नमूद केल्याचे दिसून येते, याबाबत स्पष्टपणे उल्लेख केला आहे. परंतु हुकुमनाम्याची प्रत तयार करताना, सदर मिळकतीच्या वर्णनामध्ये मौजे राळेरास असे नमूद केले आहे. वरील बाब ही तांत्रिक व टंकलिखीत चुकीचा स्वरुपाची आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तरी, दाव्याचे मूळ हुकुमनाम्यामध्ये नि.क्र.६२ मधील कलम १अ मधील पहिल्या ओळीत शेवटचे शब्द **'राळेरास'** यास काट देऊन त्या ठिकाणी **'रस्तापूर'** असे लिहिण्याबाबत / दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

०२. सामेनवाला यांना नोटीस प्राप्त होऊनही हजर न झाल्याने, त्यांच्याविरुद्ध एकतर्फा आदेश दिनांक १३.०१.२०२६ रोजी प्राप्त झाला आहे. अर्जदाराने स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.१९**, न्यायनिर्णयाची साक्षांकित प्रत **नि.२०**, हुकुमनाम्याची साक्षांकित प्रत **नि.२१**, जाहीर प्रकटन दैनिक पुढारी या वृत्तपत्र **नि.२२**, तोंडी पुरावा बंदची पुरसीस **नि.२३** वर दाखल केली आहे.

०३. अर्थातच, अर्जदाराचा विना आव्हानात्मक गेला आहे. अर्जदाराने न्यायनिर्णयाची साक्षांकित प्रत **नि.२०** वर दाखल केली, त्याचे अवलोकन केले असता, स्पष्टपणे नमूद केले आहे की, (mistakenly mentioned as Raleras instead of Rastapur in the plaint), त्यामुळे अर्जदाराने हुकुमनाम्यामध्ये केलेल्यादुरुस्तीची मागणी ही तांत्रिक स्वरुपाची आहे, असे दिसून येते. अर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:-

## आदेश

०१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. संबंधित लिपीक यांनी स्पेशल मुकदमा नं.४९/२०२० युनूस नुरमहंमद शेख वि. धनंजय पोपट लोमटे मधील दिनांक ०६.०८.२०२४ रोजी हुकुमनामा नि.६२ मध्ये मिळकतीचे वर्णन परिच्छेद क्र.१ मधील पहिल्या

ओळीतील शेवटचा शब्द, **'राळेरास'** यास काट मारुन त्या ठिकाणी **'रस्तापूर'** अशी दुरुस्ती निम्नस्वाक्षरीत यांच्या सहीने करावी. त्यानंतर तशी नोंद रोजनाम्यामध्ये घ्यावी.

PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Digitally signed by PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Date: 2026.03.13 16:23:35 +0530

बार्शीः (प्र. भ. लोखंडे)
दिनांकः १३.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, बार्शी.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that contents of this PDF file Order/Judgment are word to word same, as per the original Order/Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Stenographer Grade-2. |
| Name of the Court | : Civil Judge Sr. Division, Barshi. |
| Judgment / order signed by the Presiding Officer on | : 13.03.2026 |
| Judgment / Order uploaded on | : 13.03.2026 |